# प्राजक्ता विद्यालय येथे सायबर सुरक्षा कार्यशाळा संपन्न

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी





**अकोला दि. २५ :** प्राजक्ता विद्यालय येथे सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या विषयावर विद्यार्थ्यासाठी एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाचे सायबर वॉरियर्स चंचल निंबाळकर, ईश्वरी मोकळकर या विद्यार्थिनींनी मोबाईल आणि इंटनेटच्या चुकीच्या वापरामुळे सायबर गुन्हे मोठ्या प्रमाणात वाढत आहेत या विषयी महत्त्वपूर्ण माहिती सांगितली.

मोबाईल चा अती वापर टाळावा, सतत मोबाईल गेम्स खेळल्या मुळे कसे वाईट परिणाम होतात, व्हॉट्सप, इंस्टाग्राम, फेसबुक, ए टी एम, व्हॉईस क्लोनिंग आणि फेक वेबसाइट्सच्या माध्यमातून कशी फसवणूक होते आणि या पासून आपण कसे सुरक्षित राहावे या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. सेटिंग मधून टू स्टेप व्हेरिफ्फिकेशन करावे, सेक्युरीटी सर्टिफिकेट असलेल्याच वेबसाईटला विझिट करावे अशा सुरक्षा टिप्स विद्यार्थ्यांना सांगितल्या आणि माहितीपत्रक वाटप केले. कार्यशाळेत विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करून मोबाईलचा योग्य उपयोग करण्यासाठी शपथ दिली. ही कार्यशाळा शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय अकोला चे प्राचार्य डॉ. जे एम साबू समन्वयक डॉक्टर दीप्ती पेटकर यांच्या सहयोगाने आणि विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री सागर देशमुख सर यांच्या परवानगीने आयोजित केली होती. यावेळी शिक्षिका स्वप्नगंगा जगताप मॅडम व मीनाक्षी देशमुख मॅडम व किरण खैरे मॅडम यांच्यासह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षा विषयक माहिती आत्मसात करत जागरूकतेचा संदेश घेतला.